# हरि ॐ

## प्रज्ञापराध

माणसाच्या बुध्दींत काही विकृती आल्यास तो अनुचित कार्य करु लागतो,अनुचित मार्गाने जाऊ लागतो यालाच प्रज्ञापराध असे मानण्यात येते. माणसाची चिंतन करण्याची , विचार करण्याची शक्ती संपते त्याचे धैर्य, धीर लयास जातात व स्मरणशक्ती भ्रष्ट होऊन जाते तेव्हा तो शारीरिक व मानसिक अशा दोन्ही प्रकारच्या दोषाना उत्तेजीत करणारी अशुभ कर्मे करायला प्रवृत होतो या कर्मानाच प्रज्ञापराध असे म्हटले जाते. मन,वाणी व शरीर यांच्या प्रवृतीला कर्म म्हणतात.

## खालील गोष्टींचा संबंध प्रज्ञापराधाशी येतो.

१) आवश्यकतेपेक्षा अधिक कामक्रीडेमध्ये रत होणे.
२) वेळेवर करण्याच्या कामाची त्या त्या वेळी उपेक्षा करणे
३) नम्रतेची व सदाचारपूर्ण वागणूक न ठेवणे
४) भलत्याच वेळी अमंगल व अनुचित ठिकाणी जाणे.
५) नीच कर्म करणाऱ्या नीच माणसाशी मित्रत्व करणे.
६) सदवृत्तीचे पालन न करणे
७) पूज्य लोकांचा अपमान करणे
८) नीट जाणीव असतांना सुध्दा अहितकारक अशा ञशब्द,स्पर्श,रस,गंध इत्यादीचा उपयोग करीत जाणे.
९) उन्माद उत्पन्न होतो अशा साधनांचा उपयोग करीत राहणे.
१०) ईर्ष्या,मान,मद.लोभ,मोह,भय,भ्रम इत्यादी विकारानी घेरलेले असणे.
११) रज व तम गुणानी प्रभावित होणारी कर्मे करीत राहणे

## यावर उपाय म्हणजे

१) आध्यात्मिक जीवनशैली अंगीकारणे
२) धर्म,अर्थ,काम,मोक्ष यांचे विधीपूर्वक पालन व आचरण करणे.
३) दिनचर्या संस्कारानी युक्त ठेऊन सत्संग नियमित करणे
४) भगवंताच्या आळवणीची, उपासनेची संवय अंगी लावणे

पावित्र्य व शालीनता यांचे आचरण हे एक प्रकारचे रसायनच होय. रामरसायन हेच प्रज्ञाशक्ती प्रदान करणारे आहे.